# प्रसिद्धीपत्रक

## भूमि अभिलेख विभाग सरळसेवा भरती २०२१

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ संवर्गातील पदभरतीकामी दि. ०९/१२/२०२१ रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात येवून ऑनलाईन अर्ज स्विकृती व त्यानंतर छाननी अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/ प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ नुसार भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रीत), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार रिक्त पदभरती प्रक्रिया राबविताना स्पर्धा परीक्षा ऑनलाईन पद्धतीने (Computer Based Test) घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागातील रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्याकामी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडून कंपनीची निवड करण्यात येवून त्याकामी ऑनलाईन पद्धतीने (Computer Based Test) परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याबाबत आवश्यक त्या सुचना व वेळापत्रक लवकरच https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

स्वा/- XXX

(एन. के. सुधांशु)भा.प्र.से.

दि. ०६-०५-२०२२

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ), पुणे